दै. पुण्यनगरी दि. 26/02/2024

# गुन्हा करण्याच्या प्रयत्नात असलेली सशस्त्र टोळी गजाआड

**नवीन नांदेड :** कुणाचा तरी खून किंवा मोठा गुन्हा करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका सशस्त्र टोळीला नांदेड ग्रामीण पोलिसांनी जेरबंद केले आहे. या टोळीकडून गावठी पिस्टल, ३ काडतुसे, ४ लोखंडी खंजर जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई नांदेड ग्रामीणचे उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या पुढाकाराने ही कारवाई करण्यात आली.

पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण (जि. नांदेड) हद्दीत अवैध गावठी पिस्टल बाळगणारे आरोपीतांचा शोध घेत अटक करण्याचे निर्देश पोलिस अधीक्षकांनी दिले होते. त्यानुसार पोलिस निरीक्षक एन.एस. आयलाने,पोलिस उपनिरीक्षक महेश कोरे, प्रभाकर मलदोडे, संतोष जाधव, विक्रम वाकोडे, शेख सत्तार मगदुम, अर्जुन मुंडे, संतोष बेल्लुरोड, माधव माने, श्रीराम दासरे, चंद्रकांत स्वामी, ज्ञानेश्वर कलंदर, शिवानंद तेजबंद यांचे पथक गस्तीवर होते. तेव्हा या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, दि. २४ फेब्रुवारी रोजी रात्री ९.२० वाजता सिडकोतील केसरबाई प्रदीप सरपे यांच्या घरासमोर काही तरुण खून करण्याच्या उद्देशाने गावठी पिस्टल व लोखंडी खंजर बाळगून आहेत. ही माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलिसांचे पथक त्या भागात गेले. तेथे पोलिसांनी छापा मारत माधव रामदास गायकवाड (३२ मजुरी रा. दीक्षानगर, बळीरामपुर ता.जि. नांदेड), अजय उर्फ लड्या भगवान जोगदंड (२२ मजुरी रा.राहुलनगर सिडको, नांदेड), विशाल रमेश शितळे (२३ मजुरी रा. विजयनगर सिडको नांदेड), विधी संघर्ष बालक ,आकाश रमेश शितळे (२० मजुरी रा. विजयनगर सिडको, नांदेड) यांना ताब्यात घेतले.

अंगझडती घेतली असता माधव गायकवाड याच्याकडे लोखंडी खंजर, अजय उर्फ लड्या जोगदंडकडे लोखंडी खंजर, विशाल शितळेकडे खंजर, विधीसंघर्षित बालकाकडे खंजर, लोखंडी गावठी पिस्टल, आतमध्ये एक मॅग्झीन व मॅग्झीन काढुन पाहणी केली असता ज्यामध्ये ३ काडतुसे आढळली. हा सर्व मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या मुद्देमालाची किंमत ३३ हजार ५०० रुपये आहे. हे सर्व आरोपी कुणाचा तरी खून किंवा प्राणघातक हल्ला करण्याच्या उद्देशाने गोळा झाले होते असे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाईमुळे मोठी अप्रिय घटना टळली. या प्रकरणात पास सपोनि सचिन करीत आहेत.



नांदेड ग्रामीण हद्दीत पकडण्यात आलेली सशस्त्र गुन्हेगारांची टोळी.